पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय कंपाउंड, सोलापूर.
दुरध्वनी क्र.०२१७-२७३२०१०/फॅ.क्रं.०२१७-२७३२००८ ई-मेल-hccb.
Solapur .rural@ gmail. com

जा.क्र. पशा-२/रजिस्टर छपाई/पो.मुख्यालय/२०२३ सोलापूर ग्रामीण दि.०८/०९/२०२३

संदर्भ-: राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण याचेकडील पत्र क्र.१७६०/२०२३ दि.१८/०८/२०२३

विषय-: रजिस्टर छपाई नविदा (दरपत्रके) सादर करणेबाबत.

## आदेश-:

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये आदेशीत करण्यात येते की, पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण येथील कर्मचारी यांना आरोपी पार्टी ,बाहेरील बंदोबस्त,अंगरक्षक व इतर डयुटीची नोंद ठेवण्याकरिता आदेश बुकची अत्यंत आवश्यकता असल्याचे संदर्भाधिन पत्रात नमूद करुन राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण यानी या कार्यालयास कळविले असून सदरची रजिस्टर छपाई करणेकरिता महाराष्ट्र शासन निर्णय उदयोग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय भाखसं/२०१४/प्र.क्र-८२/भाग-३/उदयोग-४ दिनांक ०१ डिसेंबर २०१६ मधील ४.४.३ मधील नियमानुसार खाजगी/ अधिकृत्त विक्रेते यांचेकडून दरपत्रके (निविदा) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | साहित्याचे नांव | आ.संख्या | किती पानी | प्रति नग दर |
|---|---|---|---|---|
| १ | आदेश बुक छपाई | १०० नग | | |
| २ | डेली आर्म वाटप रजिस्टर | ०२ | | |
| ३ | डेली अम्युनेशन वाटप रजिस्टर | ०२ | | |
| ४ | ९ एमएम कारबाईन आर्म व अम्युनेशन रजिस्टर | ०२ | | |
| ५ | आरसीपी आर्म व अम्युनेशन रजिस्टर | ०२ | | |
| ६ | आर्म स्टॉक रजिस्टर | ०२ | | |
| ७ | अम्युनेशन स्टॉक रजिस्टर | ०२ | | |
| ८ | ९ एमएम पिस्टल अम्युनेशन रजिस्टर | ०२ | | |
| ९ | अनामत आर्म अम्युनेशन रजिस्टर (अधिकारी) | ०२ | | |
| १० | क्युआरटी आर्म अम्युनेशन रजिस्टर | ०२ | | |
| ११ | आर्म इशु रजिस्टर | ०२ | | |
| १२ | परेड आर्म वाटप रजिस्टर | ०२ | | |
| १३ | शोक परेड आर्म व अम्युनेशन रजिस्टर | ०२ | | |
| १४ | बेडी व काढणे वाटप रजिस्टर | ०२ | | |
| १५ | अश्रुधुर व ग्रीनेड वाटप रजिस्टर | ०२ | | |
| १६ | अंगरक्षक आर्म वाटप रजिस्टर | ०२ | | |
| १७ | आमर्मोर रजिस्टर | ०२ | | |
| १८ | बॅटरी वाटप रजिस्टर | ०२ | | |

अटी व शर्ती-

१. वरील साहित्याच्या सीलबंद निविदा राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण याचेकडे दि. १५/०९/२०२३ रोजी ठिक ६.०० वाजेपर्यंत समक्ष आणून दयाव्यात.

२. **दरपत्रक धारक यानी निविदेसोबत १.** दरपत्रक धारक फर्मचे नाव २. दरपत्रक धारकांचे पुर्ण नाव ३. पत्ता व दुरध्वनी क्रमांक व ई-मेल ४. शॉपअॅक्ट लायसन्स/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र ५. पॅनकार्ड व आधार कार्ड ५.

साहित्य या पूर्वी कोणत्या शासकिय कार्यालयास पुरवठा केले असल्यास त्या कार्यालयाचे पुरवठा आदेशाची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

३. रजिस्टर छपाई करणेकरिता वापरण्यात येणारा कागद ७० GSM चा असला पाहिजे.

४. रजिस्टरची शिलाई दो-यानी शिवून रजिस्टर बायडिंग करणे आवश्यक आहे.

५. रजिस्टर छपाई कॅनव्हास बायडिंग मध्ये केलेली असली पाहिजे

६. रजिस्टरच्या पुटटयाची जाडी **२८** अंश इतकी असणे आवश्यक आहे.

७. १०० पानी रजिस्टरच्या पुटटयाची जाडी **२२** अंश असणे आवश्यक आहे.

८. रजिस्टर नवीन छपाई करणे आवश्यक आहे. जुनी छपाई केलेली रजिस्टर स्विकारण्यात येणार नाहीत.

९. वर नमूद रजिस्टर हे पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण येथे समक्ष आणू दयावयाचे आहे. वाहतूक खर्च या कार्यालयाकडून देण्यात येणार नाही.

१०. वर नमूद रजिस्टर छपाईचा नमुना व किती पानी रजिस्टर लागणार आहे याबाबतची माहिती राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण याचेकडून घेणेत यावी.

११. वरील रजिस्टर हे रंगसंगतीमध्ये म्हणजेच लाल निळया रंगाचे पार्श्वभूमीवर पांढ-या रंगाच्या कव्हरमध्ये बनविणे देणे बंधनकारक आहे.

वरील अटी व शर्ती विचारात घेवून पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण येथील शाखेकरिता लागणारी रजिस्टर छपाई करुन पुरवठा करणेबाबतचे दर पत्रक (निविदा) या कार्यालयाच्या **www. solapurpolice.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेनंतर **दिनांक.१५/०९/२०२३ रोजी ठिक.६.०० वाजेपर्यंत** राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण येथे सादर कराव्यात. विहित मुदती नंतर प्राप्त दर पत्रके स्विकारली जाणार नाहीत.

**पोलीस अधिक्षक,**
**याचे मान्यतेने.**

**( विजयालक्ष्मी कुर्री )**
**पोलीस उपअधिक्षक(मुख्या),**
**पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण,**
**यांचेकरिता.**

प्रति, पोलीस निरीक्षक सायबर पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण.
२/- नमूद रजिस्टर छपाई करुन पुरवठा करणेबाबतची जाहिरात निविदा या मथळयाखाली कार्यालयाच्या **www. solapurpolice.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

**प्रत- राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय सोलापूर ग्रामीण**
२/-वरील सीलबंद निविदा प्राप्त झालेनंतर आपलेकडील अहवालासह या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात याव्यात. तसेच संबधित पुरवठाधारक याना छपाई करावयाच्या रजिस्टरचा नमूना व कोणते रजिस्टर किती पानी छपावयाचे आहे याबाबत माहिती देण्यात यावी.